विद्यापीठ अनुदान आयोग व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने

## राष्ट्रीय चर्चासत्र

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्.मय




(प्रोसिडिंग)

ISBN-978-93-83401-45-1

दि.२३ व २४ सप्टेंबर २०१६

संपादक: डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे

यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्.मय
ISBN – 978-93-83401-45-1
सप्टेंबर २०१६.

संपादक
डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे

©
प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे
न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर
ता.जि. अहमदनगर–४१४००१ महाराष्ट्र

**प्रकाशन**
शब्दगंध प्रकाशन
फुलोरा, लक्ष्मी कॉलनी, तपोवन रोड,
कसबे वस्ती, सावेडी, अहमदनगर.

**मुद्रक**
शिवमंगल कलेक्शन

**प्रथमावृत्ती**
२३ सप्टेंबर २०१६

**मुखपृष्ठ**
श्री. सतीश कुलकर्णी

---

(या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील विचारांशी संपादक मंडळ, प्राचार्य, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

| अ.नं. | शोधनिबंधाचे नाव | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| ३५ | यशवंतरावांचे भाषा व साहित्यविषयक विचार' | प्रा.डॉ. नकुलवाड दत्तात्रय सोमनाथ | १६४ ते १६९ |
| ३६ | यशवंतराव चव्हाणांचे राजकीय विचार | प्रा.डॉ.आंधळे बी. व्ही. | १७० ते १७२ |
| ३७ | महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण:व्यक्ती आणि साहित्यिक कार्य | डॉ. सोनसळे सा.द. | १७३ ते १७६ |
| ३८ | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. शिंदे बी. आर. | १७७ ते १८० |
| ३९ | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक योगदान | प्रा. दहिफळे रामकिशन | १८१ ते १८३ |
| ४० | राजकीय नेत्याचे आत्मचरित्र– कृष्णाकाठ | वाकोळे संगीता माधवराव | १८४ ते १८८ |
| ४१ | यशवंतराव चव्हाणांचे साहित्यिक योगदान | प्रा. डॉ. बोडखे जी पी. | १८९ ते १९१ |
| ४२ | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार – यशवंतराव चव्हाण | डॉ. काळे चंद्रकांत प्रभाकर | १९२ ते १९५ |
| ४३ | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. बर्वे ए.पी. | १९६ ते २०० |
| ४४ | यशवंतरावांचे राजकीय विचार | प्रा.डॉ. मिसाळ निवृत्ती विनायक | २०१ ते २०२ |
| ४५ | यशवंतरावांची राजकीय जडणघडण | प्रा.डॉ.शेळके संगिता | २०३ ते२०४ |
| ४६ | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत 'यशवंतराव चव्हाण'यांची कामगिरी | डॉ. साळे मीना | २०५ ते२०७ |
| ४७ | यशवंतराव चव्हाण यांची शिक्षणदृष्टी | प्रा.काटकर तात्यासाहेब शिवाजी | २०८ ते२१० |
| ४८ | यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक योगदान | प्रा. पाटील संजय शांताराम | २११ ते२१४ |
| ४९ | राजकीय नेत्याचे आत्मचरित्र कृष्णाकाठ | डॉ. भालसिंग वैशाली श्रीकृष्ण | २१५ ते२२३ |
| ५० | 'ग्रामीण शिक्षण' व 'शेती' बाबत यशवंतराव चव्हाण यांचे विचार | डॉ.ताहेर एच.पठाण | २२४ ते२२७ |
| ५१ | यशवंतराव चव्हाण यांचे ललितगद्य:एक गुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार | प्रा. आडविलकर सारिका | २२८ ते२३७ |

# महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण:व्यक्ती आणि साहित्यिक कार्य

३७

डॉ. सोनसळे सा.द.,
सहयोगी प्राध्यापक, मराठी
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
मो.नं. ८३७९०५४०२५

मराठी माणसांची ओळख यशवंतराव चव्हाण आहेत. मराठी मातीचा गंध सुगंध त्यांनी देशपातळीवर पोहचविला. यशवंतरावांचा जन्म एका छोटयाशा खेडयात झाला. कार्यातील सातत्यामुळे यशवंतराव देशपातळीवर पोहचले. देशपातळीवर त्यांनी मोलाचे कार्य केले. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वामध्ये अष्टपैलूंचे दर्शन होते. ते उत्तम व्यासंगी अभ्यासक होते, उत्तम वक्ता होते, राजकारणी होते, संसदपटू होते, साहित्याचे जाणकार होते. समाजाच्या सर्व स्तरांचा त्यांना अभ्यास होता. समाजाच्या विविध घटकांपर्यंत त्यांनी आपल्या कार्यकतृत्वाने प्रभाव निर्माण केला. समाजातील सर्व वर्गांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची मानसिकता होती. अनेक मोठमोठया नेत्यांसोबत त्यांचे जवळचे संबंध होते. बालपणातील जिव्हाळा सुध्दा त्यांनी त्याच तत्परतेने जपला होता. मनन, चिंतन, आणि कार्याची अंमलबजावणी हे त्यांच्या कार्याचे विशेष होते. मराठीमध्ये त्यांनी विपूल लेखन केले आहे. आयुष्यभर त्यांनी राजकारणातून वेळ काढून विविध ग्रंथाचे वाचन त्यांनी केले. ते म्हणत असत की, 'कधी साहित्यिक राजकारण्यांना मार्गदर्शन करतात, तर कधी राजकारणी साहित्यिकांना समजुन घेतात.' यशवंतरावाच्या राजकीय जीवनावर म.गांधी, पंडित नेहरू, व मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव होता. सामाजिक अन्याय अत्याचाराच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आदर्श त्यांच्या समोर होता. याबाबतीत प्रा. टी.डी.देशमुख आणि डॉ.व्ही.एल.एरंडे लिहितात, यशवंतराव यांच्या नेतृत्वगुणात जे सामाजिक, राजकीय भान होते, त्यात म.फुले, वि.रा.शिंदे, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवशाली परंपरलेला पुढे घेऊन जाणारी प्रचंडी उर्मी होती. त्यातूनच प्रचंड व प्रबळ लोकनिष्ठा हे त्यांच्या सर्वजनिक जीवनाचे खास वैशिष्टये तयार झाले.[१] लोकनिष्ठा आणि सामाजिक कार्य यशवंतरावांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावातून पुढे नेण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांनी १९६० मध्ये हा कायदा संमत करून महार वतनी गुलामगिरीतून कायमचे मुक्त केले. आणि मुख्यमंत्री असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनानिमित्त सरकारी सुट्टी देण्याचा निर्णय घेतला. वास्तविक यामुळे ते आंबेडकरवादी चळवळीचे मित्र झाले आणि पुढे दादासाहेब गायकवाड यांच्या सोबत कॉंग्रेसची युतीही झाली.

यशवंतराव चव्हाणांनी कृषि क्षेत्रात फार मोलाचे कार्य केले आहे. शेतीची अवस्था मथुरेच्या बाजारासारखी झाली आहे असेही ते एकदा म्हणाले होते.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर त्यांनी पंचायत राज या त्रिस्तरीय व्यवस्थेची सुरूवात केली. राज्य पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ केला. कोल्हापुरी बंधा—याचा प्रचार केला. कोयना व उजनी या प्रमुख प्रकल्पाच्या उभारणीला गती दिली. जवळ जवळ १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना केली. शैक्षणिक क्षेत्रात प्रगती घडविण्यासाठी मराठवाडा आताचे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व कोल्हापूर आताचे' शिवाजी विद्यापीठची स्थापना त्यांनी केली. साहित्यक्षेत्रासाठी मराठी साहित्य संकृती महामंडळ व विश्वकोश मंडळाची स्थापना केली. अशी लोकोपयोगी कामे त्यांच्या कारकीर्दीत झाली.

यशवंतराव चव्हणांनी अनेक ग्रंथाचे लेखन केले. त्यांचा वाचनाचा व्यासंगही दांडगा होता. तरीही ते स्वत:ला साहित्याचा रसिक समजात. त्या बाबतीत ते म्हणतात, ''मी साहित्य समीक्षक नाही. एक रसिक मराठी भाषक साहित्यप्रेमी आहे. आजचे विद्वान अध्यक्ष ललित व समीक्षात्मक सहित्याचे श्रेष्ठ अधिकारी आहेत. तेव्हा साहित्य विषयक प्रश्नांचा उहापोह त्या करतीलच पण साहित्य प्रेमी हा ही आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षक असतोच आणि त्या दृष्टीने काही विषयांना मी स्पर्श करणार आहे. प्रथमत: एक समीक्षा करण्यासारखी आहे. ती म्हणजे वैचारिक प्रवर्तन व प्रबोधनाच्या दृष्टीने मराठी साहित्यात काय झाले''?[२] मोठया व्यक्तींचे हेच मोठेपण असते आणि म्हणूनच ते साहित्यातून नवा विचार आला पाहिजे या विषयी म्हणतात साहित्य हे थर्मामिटर मधील पा—यासारखे संवेदनशील असते, निदान असावे. समाजाच्या मानसामध्ये जे असते तेच साहित्यात अवतरते. मराठी साहित्याचा इतिहास हेच सांगतो. आधुनिक काळात जो राष्ट्रवाद आला, जी राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली, जे स्वातंत्र्याचे नवे विचार आले, त्यांचे परिणाम साहित्यावर झाले. भारतीय समाजाच्या या रचनापर्वात नव्या विचाराची व सर्वांगीण ज्ञानाची बीजे टाकत राहणे हे साहित्यिकांचे महत्त्वाचे कार्य आहे. कारण त्या विचारांनी प्रेरीत झालेले व भारावलेले राजकीय कार्यकर्ते समाजाला पुढे नेत असतात. यासाठी वैचारिक व चिंतनशील वाङ्मयीन महती नजरेआड करण्यासारखी नाही. मला वाटते ही सामाजिकता, सामाजिक जाणीव आपल्या सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा असते. म्हणून आता नव्या सामाजिक प्रबोधनाचे चिंतन करणारे साहित्य हेच उद्याच्या मराठी साहित्याचे स्वरूप असणार अशी माझी धारणा आहे.[३] ललित साहित्य विषयी आपले मत मांडताना यशवंतराव म्हणतात सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने ललित साहित्याची/ सामाजिकताही अत्यंत महत्वाची आहे. कालबाहय निकष लावून, हेतूवादी साहित्य श्रेष्ठ ठरवावे अशा मताचा मी नाही. पण समाजाच्या प्रबोधनासाठी त्याचा भावपींड घडविण्यासाठी ललित साहित्याचा निश्चित उपयोग होतो. समाजक्रांतीविषयी अनुकूल मनोभूमी तयार करावयाची असेल, तर प्रस्थापित समाजातील विसंगती अंतर्विरोध आणि त्यामुळे निर्माण होणारी कोंडी यांच्या कलात्मक आविष्कारातून समाजावर संस्कार करता येतात.[४] असेच मत यशवंतरावांनी सहयाद्रीचे वारे या ग्रंथात मांडले आहे. साहित्याने समाजाचे हित व्हावे ही संकल्पना त्यांनी मांडली. ते लिहितात मी जेंव्हा साहित्य म्हणतो तेंव्हा ललित साहित्य म्हणतो असे नव्हे किंवा ललित साहित्य हेच तेवढे साहित्य

असाही त्याचा अर्थ नाही. ललित शब्द म्हणजे साहित्य अशी माझी कल्पना नाही. साहित्य म्हणजे सामान्य जनतेचे हित करण्याचे साहित्य अशी, साधीसुधी व्याख्या मी करतो.[५] साहित्यामध्ये विविध प्रकार आहेत. त्या वाङ्मय प्रकारापैकी आत्मचरित्र हा जो आधुनिक कालखंडात हा वाङ्मय प्रकार आला त्यात फारसे सत्य येत नसावे. लेखक काहीतरी लपवून ठेवत असावा या बाबीचे सुतोवाच करताना यशवंतराव चव्हाण म्हणतात. बालपण व तरूणपण या बाबत आत्मचरित्रे अतिशय सावध असतात. अर्थात या बाबत मी त्यांना दोष देत नाही. कारण ही सावधानता समजण्यासारखी आहे. शिवाय एखाद्या माणसाच्या अगदी खासगी जीवनात डोकवायची उत्सुकता मला वाटत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचा आदर्श घेऊन आंबेडकरवादी साहित्य निर्माण झाले. त्या साहित्याला मतलबी लोकांनी दलित ही उपाधी दिली. वास्तविक पहाता साहित्याच्या इतिहासात ही नाम बदलाची मोठी चमत्कारीक घटना आहे. आज पावेतो मार्क्सवादी लेखकांनी लिहिलेल्या साहित्याला मार्क्सवादी साहित्य म्हटल्या गेले. समाजवादी लेखकांनी लिहिलेले समाजवादी साहित्य म्हटल्या गेले. गांधीवादी लेखकांनी लिहिलेल्या साहित्याला गांधीवादी साहित्य म्हटल्या गेले. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे काय वावडे आहे इथल्या प्रस्थापितांना. या सर्वांनीच आंबेडकरवादी साहित्याला दलित साहित्य म्हटले आहे. ज्या दलित शब्दातून अस्पृश्यतेचे दुखणे अभिव्यक्त होत नाही. आंबेडकरवादी साहित्याबद्दल यशवंतराव चव्हाण म्हणतात, दलित समाजातून आलेल्या नव्या मराठी साहित्यकांनी जे साहित्य निर्माण केले आहे, ती मराठीतील एक मोलाची भर आहे. असे मी मानतो. उच्चभ्रू साहित्याचे किंवा त्यांच्या संकल्पनांचे मानदंड लावून त्याला जोखणे चुकीचे आहे. उच्चभ्रू साहित्यात पाश्चात्य वळणाची अश्लिलता आपणास चालते. दलित समाजातून येणा–या साहित्यिकाच्या भाषेत आपण नाके मुरडतो. हा नैतिक भेदभाव आहे. दुहेरी मानदंडाची भावना त्यामागे आहे असे मला वाटते. म्हणून ज्या सामाजिक स्तरातुन लेखक आलेला असेल, त्याची भाषा त्याच्या साहित्यात आली तर ती स्वागतार्ह मानली पाहिजे.[७] साहित्याच्या कौतुकाबरोबरच साहित्यिक, कलावंत, संशोधक यांना पारितोषीके दिली. अनेकांचा गौरव केला. राजकवी यशवंत यांना महाराष्ट्र कवि म्हणून भूषवले आणि बहुमान केला. याबाबतीत रामभाऊ जोशी यांनी त्यांच्या पुस्तकात पुढील नोंद केली आहे, साहित्याच्या क्षेत्रातही प्रादेशिक भाषातून लिहिलेल्या उत्कृष्ट पुस्तकांना बक्षीसं देऊन लेखकांना वाङ्मय निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याचं कार्य सरकारनं एका निर्णयाव्दारे या काळात केलं. विव्दान, संशोधक, लेखक, कलावंत, दिग्दर्शक, संगीतकार, उत्कृष्ट नाटकं व ग्रंथ यांचा बक्षिस देण्याच्या यादीत प्रथमच समावेश करण्यात आला.[८]

यशवंतराव चव्हाणांनी साहित्यावर, कलेवर निखळ प्रेम केले. त्या प्रमाणेच त्यांनी महाराष्ट्रातील मराठी माणूस मराठा आहे. मराठा हा जातीवाचक शब्द नाही तर तो भाषावाचक शब्द असल्याचे स्पष्ट करताना म्हटले मराठा हा जातिवाचक नाही. आचार्य आपल्या वर्तमानपत्राला मराठा हे नाव दिले तर काय तो शब्द जातिवाचक आहे म्हणून दिले? मराठा शब्दामागे महाराष्ट्राच्या एक

ISBN NO : 978-93-83401-45-1

जिनसी जीवनाची भावना आहे. मराठा शब्दाचा हाच अर्थ आम्हाला अभिप्रेत आहे. म्हणून मराठी राज्य हे कोणा एका जमातीचे राज्य मुळीच होता कामा नये, या गोष्टीवर माझा जरूर विश्वास आहे[९] तरीही जो कुणबी समाज स्वत:ला मराठा समजतो. त्यांच्या संदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात, महाराष्ट्रातील बहुसंख्य खेडयात आहे आणि त्यात मराठा समाज बहुसंख्येने जास्त असल्याने महार, चांभार, ब्राम्हण, सुतार, माळी इ. अल्पसंख्याक लोकांचे रक्षण करण्याची जबाबदारी मराठयांवर आहे[१०]

यावरून यशवंतराव चव्हाणांची ग्रामीण माणसावर कशा प्रकारची नजर होती हे स्पष्ट होते. हीच सर्वांग जाण त्यांना होती.

**संदर्भ**


१. प्रा.देशमुख, टी.डी./डॉ.एरंडे, व्ही.एल.– महाराष्ट्राच्या जडणघडणीतील मा.यशवंतरावजी चव्हाणांचे योगदान – आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, संपा–डॉ.व्ही.एल.एरंडे–प्र.आ.२०१३ पृ.४४.

२. प्रधान राम, संपा.–शब्दांचे सामर्थ्य– यशवंतराव चव्हाण यांचे लेख साहित्य व भाषणे, अमेय प्रकाशन, पुणे – २०१२ – पृ.४०२, ४०३.

३. कित्ता – पृ.४०३

४. कित्ता – पृ.४०४.

५. चव्हाण, यशवंतराव – सहयाद्रीचे वारे – यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई – १९९२. पृ.३००,३०१.

६. चव्हाण, यशवंतराव – ऋणानुबंध – प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे – प्र.आ. १९९४, पृ.२२२

७. चव्हाण, यशवंतराव – ऋणानुबंध – प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे – प्र.आ. १९८४, पृ.२१३,२१४

८. जोशी, रामभाऊ – यशवंतराव एक इतिहास – प्रतिभास प्रकाशन, परभणी – २०१० – पृ.३४२.

९. चव्हाण, यशवंतराव – ऋणानुबंध – प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे – प्र.आ. १९८४.

१०.कित्ता – ३४५.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani